# ज्ञान प्रबोधिनी: स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

## वार्षिक वृत्त

### राष्ट्रीय शके १९३४ (सन २०१२-१३)

**स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण) या विभागाच्या वतीने किशोरी, युवती व महिला या गटांसाठी व्यक्तिविकासापासून नेतृत्व विकसनापर्यंतच्या कार्यक्रमांची योजना आखण्यात येते. राष्ट्रीय शके १९३४ (सन २०१२-१३) या वर्षातील कामाचे वृत्त पुढे देत आहोत.**

## किशोरी विकास



पाक्षिक तासिका



तंबूतील शिबिर



विद्याव्रत

*** नित्य संपर्क :** किशोरींसाठी पाक्षिक तासिका आणि नैमित्तिक उपक्रमाद्वारे वर्षभर संपर्क केला जातो. वेल्हे, भोर व हवेली तालुक्यातील१४ शाळांबरोबर हे आपले काम चालू आहे. **याद्वारे** एकूण ७० गावांमधील ४५० विद्यार्थिनींपर्यंत आपण पोहोचतो.

पाक्षिक तासिकांपैकी एक तासिका ही व्यक्तिमत्त्व विकसनासंबंधीचा **आशय संपन्न करणारी** तर एक **हस्तकौशल्ये** व जीवनविषयक कौशल्ये शिकवणारी अशी असते.

या वर्षी आशयाच्या तासिकेत कथाकथनतंत्र, संवाद कौशल्ये व संभाषण कौशल्यांवर सत्रे झाली. तसेच अभ्यास कौशल्ये, अभ्यासाचे महत्त्व व नियोजन,थंडीतील आहार, प्रसंगनाट्य, विज्ञान प्रयोग यावर सत्रे झाली. व्यक्तिमत्त्व विकसन म्हणजे काय? चांगल्या सवयींचे महत्त्व व त्या कशा विकसित करायच्या यावर सत्रे झाली. हस्त कौशल्यामध्ये वारली चित्रकला, टिशू पेपर फुले, राखी बनविणे, परसबाग,शिवणाचा रुमाल, आकाशकंदील व पणत्या, भरतकाम, क्रेप कागदाची फुले, घडीचे निरांजन, मेंदी अशी कौशल्ये झाली.

*** तंबूतील शिबिरे:** २३ ते २५ नोव्हेंबर २०१३ या काळात झालेल्या शिबिरात ८ शाळांमधील ८वीच्या ५४ विद्यार्थिनी उपस्थित होत्या. दहावीच्या ६ विद्यार्थिनी सहभागी झाल्या. सुनिलाताई गोंधळेकर यांनी प्रसंगनाट्यावरचे प्रशिक्षण घेतले. यानंतर गावामध्ये जाऊन मुलींनी गटागटांनी प्रसंगनाट्ये सादर केली. सांगवी गावात दारूबंदी, अंधश्रद्धा, हुंडाबळी, मुलगी वाचवा या विषयांवरील प्रसंगनाट्ये केली. सुवर्णा गोखले यांचे सत्र झाले. *'वाईट गोष्टी आम्हाला चालणारच नाहीत'* असे आपण ठामपणाने म्हणायला शिकले पाहिजे, असा त्यांच्या बोलण्याचा विषय होता. "सर्वसाधारण प्रबोधिनीपण" म्हणजे काय हे पुस्तिकेच्या वाचनाच्या आधारे चर्चा होऊन मुलींनी समजावून घेतले. दिवाळीतील किल्ल्यांच्या प्रतिकृती करण्याची स्पर्धा झाली. राजगडावर सहल होऊन समारोप झाला.

*** विद्याव्रत :** कल्याण व कुसगाव या गावांमध्ये गावकऱ्यांच्या मागणीतून विद्याव्रताचा कार्यक्रम शाळेत घेण्यात आला. ८वीच्या अनुक्रमे ६० व ५१ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विद्याव्रत घेतले. गावाच्या वतीने विद्याव्रताचा आग्रह होऊन विद्यार्थिनींनी असे व्रत ग्रहण करण्याचे हे पहिले कार्यक्रम होते. दोन्ही कार्यक्रमांना सरासरी १०० जणांची उपस्थिती होती.

*** प्रशिक्षक प्रशिक्षण :-**दि. १ व २ मार्च २०१२ रोजी सोलापूर येथे किशोरीविकास प्रशिक्षक प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. किशोरी विकास उपक्रमाची आखणी, नियोजन, कार्यवाही, तासिकांमधील आशय व याबद्दलची सत्रे तसेच सोलापुरातील ज्ञानसागर विद्यालयातील १०० विद्यार्थिनींसोबत त्याची प्रात्यक्षिके असा प्रशिक्षण वर्गाचा कार्यक्रम होता. यात साहित्य निर्मितीही झाली व हस्तकौशल्यांवरचे सत्रही झाले. किशोरी विकास उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ८ माजी विद्यार्थिनी व शिशु अध्यापिका वर्गाच्या ३२ विद्यार्थिनी अशा ४०जणी उपस्थित होत्या.

**✻ ग्रंथालय योजना :** भोर आणि वेल्हे तालुक्यात यंदा नव्याने एकूण १० गावांमधून ग्रंथालय योजना राबविण्यात आली. प्रत्येक ग्रंथालय पेटीत साधारण २०० पुस्तके देऊन उद्घाटन करण्यात आले.



**गाव पातळीवर शिबिर**

**✻ गाव पातळीवर शिबिरे : विविध माध्यमांमधून** वेल्हे, भोर व हवेली तालुक्यांमधील ४५ गावांमध्ये शिबिरे झाली. ही शिबिरे घेण्यासाठी निगडीच्या ज्ञान प्रबोधिनीतून ९वीच्या किशोरी व किशोर गावांमध्ये आले होते. याच सोबत युवक विभाग, युवती विभाग आणि अग्रणी–प्राग्रणींच्या माध्यमातून गावपातळीवरील शिबिरे झाली. शिबिरे घेणाऱ्यांचा मुक्काम बहुतेक ठिकाणी गावांमधूनच झाला. बचतगटप्रमुखांनी त्यांच्या निवासाची योजना केली. गावपातळीवरील ७५० किशोर–किशोरींनी या शिबिरांचा लाभ घेतला.

**✻ क्रीडाकुल चाचणी** :– १० गावांमधील ४८ विद्यार्थिनींची क्रीडाकुल प्रवेशासाठीची चाचणी झाली. ५ जणी पुढील चाचणीसाठी निवडल्या गेल्या. वेल्हे तालुक्यातून आवर्जून क्रीडाक्षेत्रात मुली जाव्यात म्हणून गेल्या ३ वर्षांपासून आपण ही चाचणी वेल्हे तोरणा विद्यालयात घेत असतो.




**कथाकथन स्पर्धा**

**✻किशोरी मेळावा :–** २४ फेब्रुअरी रोजी घोरेपडळ येथे दहावीची परीक्षा झालेल्या तुकडीचा एका दिवसाचा मेळावा झाला. या मेळाव्यास ३० जणी उपस्थित होत्या. त्यात मुख्यतः 'दहावीनंतर काय?' या विषयावर विविध उपलब्ध पर्यायांवर मानसीताई बोडस यांचे सत्र झाले व मुलींचे शंकानिरसन झाले.

प्रबोधिनी पातळीवरही दहावी नंतर किशोरी विकास तासिकेद्वारे जरी मुली जोडलेल्या राहील्या नाहीत तरी विविध प्रकारांनी युवती विभागामधून त्या कशा जोडलेल्या राहतील ,यावर चर्चा झाली व त्याचा निष्कर्ष म्हणून मुलींनी गावपातळीवरील दले सुरु केली.

**✻ निवासी शिबिर :–** किशोरी मेळाव्यास आलेल्या ३० जणींचे ज्ञान प्रबोधिनी पुणे येथे निवासी शिबिर झाले. यात मुख्यतः शिक्षणाचे महत्त्व असा विषय होता. ***'शिकाल तर टिकाल'*** हा शिबिराचा विषय होता. शिबिरात मुलींनी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेस भेट देऊन स्त्रियांच्या शिक्षणाची महाविद्यालये व विभाग मिळून १४ उपक्रम पाहिले. सर्व मुलींची बुद्धिमत्ता व कल चाचणी अशा दोन चाचण्या प्रज्ञा मानस विभागातर्फे घेण्यात आल्या. मा. अनिलराव शहाणे यांच्याशी मुलींच्या गप्पा झाल्या. नेतृत्व विकसन, पौगंडावस्थेतील आरोग्याचे प्रश्न व व्यसनाधीनता तसेच शिक्षणाचे महत्त्व या विषयावर सत्रे झाली.



**पाक्षिक तासिका : शास्त्रीय प्रयोग**

**✻ कथाकथन स्पर्धा:–**साने गुरुजी कथामालेसोबत ज्ञान प्रबोधिनीने आयोजित केलेल्या स्पर्धेत वेल्हे तालुक्यातील ८ शाळांमधील ४९ विद्यार्थिनी सहभागी झाल्या. प्रबोधिनीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त हा कार्यक्रम आयोजित केला होता.

**✻ हिमोग्लोबीन तपासणीः–** वेल्हे तालुक्यातील २९ गावांमधील १००० किशोरींच्या रक्ताची तपासणी ICDS,वेल्हे यांच्या साहाय्याने करण्यात आली. मुलींच्या रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण तपासण्यात आले. यासाठी सिकोया इंडस्ट्रीज या कंपनीने अर्थसाहाय्य केले तर जनकल्याण रक्तपेढीने वैद्यकीय साहाय्य केले.



**हिमोग्लोबीन तपासणी**

# युवती विकास

**✻ जास्वंद वर्ग :** वेल्हे तालुक्यातील युवतींसाठी आठवड्यातून ४ दिवस असा ४ महिन्यांचा कौशल्य प्रशिक्षणाचा वर्ग घेतला जातो. औपचारिक शिक्षणाची दारे ज्यांच्यासाठी बंद झाली आहेत अशांसाठी व शिक्षण चालू असणाऱ्यांसाठीही असे ८ वर्ग आजपर्यंत घेतले गेले. १५ नोव्हेंबर २०१२ ते१५ मार्च २०१३ या काळात ६ गावांमधील १५ जणींसाठी जास्वंद वर्ग आंबवणे येथे झाला. या वर्गात शिवणकाम, विणकाम, आरोग्य इ. विषयांवरील सत्रे झाली.

**✻ कौशल्य प्रशिक्षण वर्ग :** वाजेघर येथे ४ गावांमधून येणाऱ्या ८ युवतींनी **शिवण कौशल्याच्या** वर्गात सहभाग घेतला. वाखाच्या वेण्या बनविणे व मेंदी वर्गाचाही त्यांनी लाभ घेतला.

*** ब्युटी पार्लर वर्ग :** वाजेघर येथे ९ विद्यार्थिनींनी ब्युटी पार्लरचा वर्ग पूर्ण केला.

*** शिवरे मेळाव्यात सहभाग :–** शिवरे गावातील महिलांनी संक्रांतीनिमित्त आयोजितकेलेल्या खोरे पातळीवरील मेळाव्यास जास्वंद वर्ग व वाजेघर मधील कौशल्यवर्गाच्या युवती उपस्थित होत्या.

*** सोलापूर व हराळी सहल :** जास्वंद वर्गातील विद्यार्थिनींची सहल सोलापूर व हराळी प्रबोधिनीस गेली. सोलापूर येथे त्यांनी प्रबोधिनी परिचय, बालमानस व वर्तनशास्त्राचे पाठ, सायन्स सेंटरला भेट व तारांगण पाहणे तसेच पेट्रोल पंपाच्या व्यवसायातील विविध आयामांविषयी श्री. कुलकर्णी यांची मुलाखत असा कार्यक्रम होता तर हराळी येथे प्रबोधिनीचे उपक्रम पाहण्याबरोबर माकणी व जेवळी येथे युवतींची शिबिरे मुलींनी घेतली. या शिबिरास अनुक्रमे २५ व ३०जणी उपस्थित होत्या.

*** गावपातळीवरील शिबिरे :–** निगडी येथील इयत्ता ९वीतील अग्रणींबरोबर पाच गावांमधील किशोर–किशोरींची शिबिरे वांगणी, वांगणीवाडी, मांगदरी, चिरमोडी व वडगाव झांजे या गावांमध्ये झाली. २ दिवसांच्या शिबिरांमध्ये २५० मुला–मुलींनी भाग घेतला. जास्वंद वर्गाच्या युवतींनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

## नेतृत्व प्रशिक्षण

*** शिवरे मेळाव्यात सहभाग :–** शिवरे गावातील महिलांनी संक्रांतीनिमित्त आयोजित केलेल्या खोरे पातळीवरील मेळाव्यास जास्वंदवर्ग व वाजेघर मधील कौशल्यवर्गाच्या युवती उपस्थित होत्या.

*** ग्रामसभांच्या आयोजनात सहभाग :–** प्रबोधिनीतील स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी व भावी प्रशासकांच्या सहकार्याने ४ गावांमध्ये युवतींच्या मदतीने गाववार महिला ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले. गेल्या ४ वर्षांपासून सातत्याने होणाऱ्या ग्रामसभांमुळे महिलांच्या सहभागा विषयी जाणीव जागृती वाढली आहे.

*** सातारा शिबिरांमधील सहभाग :–**सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यात १० ठिकाणी महिलांची एक दिवसांची व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे झाली. त्या शिबिरांमध्ये ४ गावांमध्ये ८ युवतींनी साहाय्य केले आणि किशोरींची शिबिरे घेतली.

त्याचप्रमाणे खंडाळा तालुक्यातील १० गावांमध्ये एक दिवसीय किशोरी शिबिरे घेतली. त्यात ३५० किशोरी सहभागी झाल्या. १२ युवतींनी ही शिबिरे घेण्यासाठी मदत केली.

*** शिक्षण–** शालेय शिक्षण अर्धवट सोडावे लागणाऱ्या ग्रामस्थांसाठी शिक्षणाला पुन्हा जोडून घेण्याची संधी मिळाली. या वर्षी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या १० वी समकक्ष परीक्षेस ७० महिला बसल्या आणि चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्या. सर्व महिलांचा आत्मविश्वास त्यामुळे वाढला आहे. आपल्या कार्यकर्त्या कावेरीताई शिवरकर व त्यांचा मुलगा दोघेही एकावेळी परीक्षेस बसले व उत्तम गुणांनी परीक्षा उत्तीर्ण झाले. काम करताना असा बाहेरून दहावी होण्याचा मान त्यांनी मिळवला.

वेल्हे तालुक्यातील ५१ युवतींनी १२ वी समकक्ष परीक्षेसाठी नावे नोंदली. त्यापैकी ३९ जणी परीक्षेस बसल्या व ३८जणी उत्तम मार्कांनी पास झाल्या. या युवतींसाठी दर रविवारी एक अशा १६ तासिका घेण्यात आल्या. यात इंग्रजी गणित या विषयांचे मार्गदर्शन झाले.

*** साहाय्यक परिचारिका वर्ग :–** या वर्षी वेल्हे तालुक्यातील १७ युवतींकरिता आंबवणे येथे साहाय्यक परिचारिका वर्ग घेण्यात आला. नसरापूर येथील सिद्धिविनायक रूग्णालयात त्यांनी प्रॅक्टिकल पूर्ण केले.

*** शिष्यवृत्ती :** दुर्गमता आणि आर्थिक कारणांमुळे शिक्षणात खंड पडू नये म्हणून होतकरू विद्यार्थिनींना शिक्षणासाठी विद्यावेतनाची योजना आपण करीत आहोत. नर्सिंग वर्गासाठी दुर्गम भागातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींसाठी प्रवासखर्चाची तर काही जणींच्या प्रवेश खर्चाची रक्कम या विद्यावेतनातून उभी राहिली.



ब्युटी पार्लर वर्ग



हराळी फळप्रक्रिया



गावपातळीवरील शिबिरे



शिक्षण

# महिला विकास



होमनर्सिंग वर्ग

**✽ अभ्यास सहलींचे व्यक्तिमत्त्व विकसनासाठी व्यासपीठ:** गेल्या काही वर्षांपासून सहलींना गावागावातून मिळणारा प्रतिसाद आणि त्यातून होणारे जीवन शिक्षण पहिले आणि या सहलींचा उपयोग शैक्षणिक साधन म्हणून करता येईल, ही कल्पना आली. यामुळे तीन वर्षांपासून हेतुपुरःस्सर अभ्याससहलींची योजना करत आहोत. यातून महिला एकत्र यायला शिकतात. आपल्या गावकुसाबाहेर न येणाऱ्या महिला आता तिरुपती बालाजी साठी दुसऱ्या राज्यात स्वतःच्या खर्चाने जायला लागल्या आहेत. वेगळ्या राज्यातील प्रवास, तेथील भाषा, संवाद, देव दर्शन घेण्या बरोबरच विविध विकासाचे उपक्रमही त्या पाहू लागल्या आहेत. बालाजी बरोबरच भीमाशंकर, सज्जनगड अशा तीर्थक्षेत्रांना स्वतंत्र सहली काढल्या. यात सहभागी झाल्याने त्यांचा आत्मविश्वास तर वाढलाच पण त्यांना पुढारपण आले. महिला फक्त महिलांचेच असे कार्यक्रम पुढाकाराने नक्कीच करू शकतात आणि ते खात्रीने यशस्वी होऊ शकतात असा विश्वास त्यांना आला. याच विश्वासाने त्या आता गावातील किशोरींच्या व महिलांच्या कार्यक्रमाच्या योजक बनल्या आहेत.



सहल : तिरुपती बालाजी

**✽ सुवर्णमहोत्सवी वर्षा निमित्त आयोजित विविध कार्यक्रम**

**१) ५० गावांमधील प्रबोधिकांचा वेल्हे कार्यालयात मेळावा :-**

प्रबोधिनीला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने दि. ८ ऑगस्ट रोजी शिवगंगा गुंजवणी खोऱ्यातील ५० गावांमधील ५० महिला ग्रामप्रतिनिधींचा मेळावा वेल्हे येथे झाला. या मेळाव्यास मा. रामभाऊ डिंबळे व मा. कार्यवाह सुभाषराव देशपांडे मार्गदर्शनासाठी आले होते. प्रबोधिनीच्या उपक्रमांमध्ये यायला लागल्यामुळे स्वतःमध्ये झालेल्या बलदांबद्दलचे अनुभवकथन या ५० पैकी २१ जणींनी स्वयंस्फूर्तीने केले.



५०गावांमधील प्रबोधिकांचा वेल्हे मेळावा

**२) सातारा मेळावेः** शिवगंगा गुंजवणी खोऱ्यातील २४ गावांमधील ६५ प्रबोधिकांनी सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील गावांमधील महिलांसाठी विस्ताराचे मेळावे घेतले. सावित्रीबाई फुले जयंतीचे निमित्त साधून सुवर्णमहोत्सवी वर्षाचा उपक्रम म्हणून केलेल्या या विस्तार कार्यक्रमात त्यांनी एका दिवसीय मेळाव्यांमधून साताऱ्यातील बहिणींना त्यांनी सावित्रीची ओवी, संक्षिप्त चरित्र, विविध खेळ, प्रबोधिनीच्या महिलांविषयीच्या उपक्रमाची माहिती, विविध खेळ आणि स्व ची ओळख असे कार्यक्रम घेतले. स्थानिक महिलांच्या नेतृत्वातून पहिल्यांदाच असे मोठ्याप्रमाणावर शेजारील तालुक्यात काम झाले.

बचतगट चळवळीतील महिलांनी आर्थिक विकासाबरोबरच स्वतः पुढाकार घेऊन काम करण्याचे वळण ज्या प्रबोधिनीतील कामामुळे त्यांना पडले त्यातील गमक त्यांनी त्यांच्या सातारा विस्तारात सर्व ग्रामस्थांना सांगितले.



सातारा मेळावे

**३) कार्य प्रात्यक्षिके पाहण्यासाठी सहभागः-**शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यातील गावांमधील जवळजवळ ३०० महिला व युवतीं पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये झालेल्या ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यप्रात्यक्षिकांच्या कार्यक्रमास उपस्थित राहिल्या. यात सर्व विभागाच्या सदस्यांनी सहभाग घेतला होता आणि प्रबोधिनीच्या विविध विभागांचे काम त्यांनी नाट्यरूपाने सादर केले. निगडी क्रीडाकुलाच्या प्रात्यक्षिकांनी कार्यक्रमास सुरवात झाली. या नाट्यरूप प्रात्यक्षिकांमुळे प्रबोधिनीच्या कामाची कल्पना ग्रामस्थांना स्पष्ट झाली.

# आर्थिक

**बचत गट :** ज्ञान प्रबोधिनीच्या वतीने चालणाऱ्या बचत गटांचे दैनंदिन व्यवस्थापन जिजामाता प्रबोधन केंद्राद्वारे केले जाते. सध्या ४० गावांत २७९ गटांमध्ये ४९५०

सभासद सहभागी आहेत. या सर्व गटांची मिळून दरमहा बचत रु. ९ लाख जमा होते. मार्च २०१३ अखेर सर्व गटांनी गट सुरू झाल्यापासून आजपर्यंत रू. १,५५,०६,१५३/- ची बचत केली तर रू. ४,११,०१,००९/- चे कर्ज परस्परांना दिले.

***बचतगटातून भांडवलासाठी कर्ज** : बचतगटातून भांडवलासाठी कर्ज घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. यातून स्वतःच्या जबाबदारीवरचे छोटे छोटे उद्योग बचतगटाच्या भरवशावर करताना महिला दिसतात.



**हिशोबाचे वार्षिक मेळावे**

## स्वयंरोजगार प्रशिक्षणे

स्वयंरोजगाराच्या उपक्रमात विविध प्रशिक्षणे झाली. त्यात रजई शिवणे ८ गावांमधील ३५ जणी, उकडीचे मोदक करणे विरवाडी गावांमधील २५ जणी, शतावरी कल्प तयार करणे ४ गावांमधील २० जणी आणि मसाज तेल बनविणे गाऊडदरा गावातील १५ जणी सहभागी झाल्या.

*** पारंपरिक खेळः**–गेल्या २ वर्षांपासून पारंपरिक खेळांमधून रोजगार उपलब्धीचे छोटे–छोटे प्रयोग आपण केले. यात रहाटवडे आणि कुसगाव या दोन गावांमधील गट तयार झाले आहेत. या खेळांची मंगळागौरीला व पुण्यातील गणेशोत्सवातील मिरवणुकीत प्रात्यक्षिक करणे असे प्रयोग केले गेले. यातून पुण्यातील विविध महिलामंडळांसमोर पारंपरिक खेळांची आर्डर गटाला मिळू लागली आहे. असे दोन गट सोसायट्यांच्या कार्यक्रमांमधून खेळ सादर करतात. यातून नवीन रोजगाराची संधी महिलांच्या समोर आली.



**बचतगटातून उद्योगाकडे**

मधुरांगण या सकाळच्या वतीने उपलब्ध केल्या गेलेल्या व्यासपीठावर रहाटवड्याच्या महिलांनी पारंपरिक खेळ करुन पुण्यात ३रा क्रमांक पटकावला.

*** दख्खनच्या जत्रेत पारंपरिक खेळांचा कार्यक्रम**–दख्खनची जत्रा या पुणे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेद्वारे आयोजित महिला बचतगटांच्या महाराष्ट्र पातळीवरील जत्रेत पारंपारिक खेळाचे प्रदर्शन झाले. उपस्थितांनी भरपूर प्रतिसाद दिला.

*** नवदुर्गांचा गौरव :**– नवरात्रीच्या निमित्ताने पुण्यातील एस एम. जोशी सभागृहात 'विश्वरूप कन्सेप्ट्स्' आणि ज्ञान प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या 'नवदुर्गा' ह्या स्त्री शक्तीच्या गौरवाच्या कार्यक्रमात आपल्या पारंपरिक खेळांचा कार्यक्रम पहिल्यांदाच मोठ्या स्टेजवर पुणेकरांसमोर झाला. तसेच या कार्यक्रमात आपल्या कार्यकर्त्या भारतीताई खासबागे व कावेरीताई शिवरकर यांना नवदुर्गा पुरस्कार मिळाला.



**पारंपरिक खेळ : बक्षिस स्वीकारताना**

*** राम सीता पुराणिक तंत्र निकेतनः**–या उपक्रमाद्वारे ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराच्या कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते. यात शिवणवर्गांचा प्रामुख्याने समावेश होतो.

गेल्या वर्षभरात शिवणवर्गांमधून तयार झालेल्या ६ महिलांनी दीनानाथ रुग्णालयाद्वारे देण्यात आलेली ऑपरेशन थिएटरमध्ये लागणाऱ्या ५ प्रकारच्या कापडी वस्तूंचे १०,०००रुचे उत्पादन केले. तसेच लहान मुलांसाठी तयार केलेल्या बाळंतविड्याचे ( झबले, टोपडे, दुपटे, लंगोट) उत्पादन २०,०००रुपयांपर्यंत गेले.

*** फटाके विक्री** :– यावर्षी प्रथमच गावपातळीवरील विक्रीकेंद्राद्वारे रु.२५,०००/– ची फटाके विक्री करण्यात आली. या उपक्रमाला मिळालेल्या प्रतिसादामुळे पुढील वर्षी गावपातळीवरील विक्री केंद्रे चालू करण्याचे महिलांनी ठरविले आहे.



**राम सीता पुराणिक तंत्र निकेतन**

## आरोग्य

*** गरोदर महिला तपासणीः–** प्रबोधिनीमार्फत गेली ४ वर्षे सातत्याने वेल्हे तालुक्यातील आंबवणे गावामध्ये गरोदर महिलांच्या तपासणीचे केंद्र चालू आहे. पाटणकर नर्सिंग होमचे तज्ज्ञ डॅक्टर आणि त्यांच्या सोबतचा ६ जणींचा गट महिन्यातून एक दिवस तपासणी व तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शनाची सेवा सातत्याने देत आहेत. गरोदर मातांची तपासणी, स्त्री रोगासंदर्भातील तपासणी, रक्त तपासणी, तसेच वंध्यत्वासंदर्भातील तपासणी

अशी सेवा देण्यात येते. यावर्षी एकूण ६० गावांमधील ५९५ जणींची तपासणी झाली.

केंद्राद्वारे वर्षभरात वंध्यत्वावर उपचारासाठी २५ जणी आल्या होत्या व १६ जणींना अपत्यप्राप्ती झाली. याशिवाय पुण्यातील पाटणकर नर्सिंग होम येथे वर्षभरात मिळून किमान १०० जणींना स्त्रीरोगाशी निगडीत विविध प्रकारचे उपचार तसेच शस्त्रक्रिया अत्यल्प दरात उपलब्ध झाल्या.



आंगणवाडी मदतनीसांचे प्रशिक्षण

*** आंगणवाडी मदतनीसांचे प्रशिक्षणः–** वेल्हे तालुक्यातील ७० आंगणवाडी मदतनीसांची आरोग्यविषयक प्रशिक्षणाची ४ सत्रे वर्षभरात झाली. या दर दोन महिन्यांनी होणाऱ्या सत्रांसाठी ७०जणी उपस्थित होत्या.

*** महिला तपासणी** :– डॉ. स्नेहल पुरंदरे यांनी या वर्षी शिवापूर आणि वेल्हे येथे अनुक्रमे ७५ व ४५ महिलांची स्त्री–रोग व सर्वसाधारण रोगांसाठीची तपासणी केली. तसेच प्रबोधिनीच्या ३८ कार्यकर्त्यांचीही तपासणी झाली.

*** महिलांसाठीचे विविध कार्यक्रम–**वेल्हे तालुक्यातील १७ गावांमधून महिलांसाठी विविध कार्यक्रम घेतले.



महिला रक्त तपासणी

**१) नवविवाहितांचे समुपदेशन :** या प्रसंगी १२ जोडप्यांना मा. सिंधुताई जोशी यांनी मार्गदर्शन केले.

**२) कौटुंबिक समुपदेशन : कायदेविषयक समुपदेशन–** गावांमधील महिलांसाठी महिलांविषयक कायद्याची माहिती देण्यात आली. यात विवाह, घटस्फोट, वारसाहक्क या विषयांवरील माहिती सर्वांना देण्यात आली. वेल्हे तालुक्यात १५ गावांमध्ये ही सत्रे झाली. यात एकूण ७५० महिलांनी सहभाग घेतला.

*** कौटुंबिक न्यायालय वर्ग** :– वेल्हे तालुक्यातील ४३ गावांमधील समुपदेशकांसाठी कौटुंबिक न्यायालयाद्वारे समुपदेशनाची तंत्रे शिकवणारा प्रशिक्षक प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. यासाठी न्यायालयातील ४ वकील तसेच न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती फरसवाणी या उपस्थित होत्या.

## नेतृत्व

*** गावांमधून महिला ग्रामसभाः–**गेली ४ वर्षे सातत्याने ज्ञान प्रबोधिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राच्या साह्याने आपण वेल्हे, भोर व हवेली तालुक्यातील गावांमध्ये महिला ग्रामसभा आयोजित करित आहोत. गावांमधून वर्षभरातून ४ महिला ग्रामसभा घेणे हे अनिवार्य आहे, परंतु बऱ्याच गावांमध्ये अशी महिलांची ग्रामसभा होत नाही. ज्ञान प्रबोधिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील ५० विद्यार्थ्यांच्या मदतीने अशा ग्रामसभा आपण घेतल्या. हे उद्याचे अधिकारी हे ग्रामस्थांच्या मुलाखती घेऊन एकूण गावाच्या विकासाचे मुद्दे चर्चेत येतील असे पाहतात. कुपोषित मुलांचा प्रश्न, महिलांसाठी विविध योजना व त्यांसाठी आरक्षित निधी, स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था याविषयीचे महत्त्वाचे विषय यात घेण्यात आले. मुख्यतः वेल्हे तालुक्यातील गावांमध्ये सातत्याने महिला ग्रामसभा होत आहेत. ३० गावांमध्ये यावर्षी २५ जानेवारीला सभा झाल्या.



नवविवाहितांचे समुपदेशन

*** स्थानिक कार्यकर्त्यांचे सत्कार**

सकाळच्या मधुरांगण व्यासपीठाच्या वतीने ग्रामीण भागातील किशोरींसमोरील आदर्श अशा कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. यात ***'लेक वाचवा'*** या सदरात द्वारकाताई वालगुडे या वेल्हे येथील ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्तीचा सत्कार करण्यात आला. चार लेकींची जबाबदारी एकटीने पेलून स्वतःच्या कर्तृत्वातून घराला सावरणाऱ्या द्वारकाताई या समाजासमोर आल्या.



कौटुंबिक समुपदेशन वर्गात न्यायाधिश फरसवाणी

***राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान** :– शासनासोबत राष्ट्रीय जीवनोन्नती अभियानामध्ये ज्ञान प्रबोधिनीला भोर व वेल्हे तालुक्यातील प्रेरिकांचे प्रशिक्षण करण्याची संधी मिळाली. या उपक्रमांतर्गत भोरमधील ४० तर वेल्ह्यातील ४० प्रेरिकांचे प्रशिक्षण

प्रबोधिनीच्या सुवर्णाताई, भारतीताई खासबागे, आशाताई सुर्वे, आशाताई गोगावले, हीराबाई जोरवेकर यांनी केले.

तसेच यशदा येथील शासनाच्या लेखन कार्यशाळे (write shop) साठी सुवर्णा गोखले व बागेश्री पोंक्षे यांनी यशदा येथील २ दिवसांच्या कार्यक्रमात सहभाग घेतला.

या कार्यक्रमात राष्ट्रीय जीवनोन्नती अभियानामध्ये गावातील बचतगटांमधील सदस्यांना विविध महत्त्वाच्या विषयांची तोंडओळख व्हावी व त्यासंबंधांतले त्यांचे प्रशिक्षण व्हावे म्हणून आर्थिक साक्षरता, बचतगट संकल्पना जीवनोन्नती अशा विविध ६ विषयांवरील प्रशिक्षक प्रशिक्षण पुस्तिकांचा आराखडा अंतिम करण्यात आला. ही पुस्तिका ग्रामीण भागातील स्थानिक साधन व्यक्तीस वापरता यावी या उद्दिष्टाने तयार करण्यात आली.



बचतगटाच्या सदस्यांचा गावमेळावा

*** नवे पायंडे घालण्यात पुढाकार**

**१)शासनाच्या योजनेमध्ये प्रेरिका पदावर निवड :-** ज्ञान प्रबोधिनीच्या ६ कार्यकर्त्यांची शासनाद्वारे प्रेरिकापदावर निवड झाली. कामातील उत्तमतेमुळे शासनाच्या योजनेवरही ठसा उमटविणाऱ्या प्रबोधिकांच्या कामाला मिळालेली ती पावतीच होती.

**२)साधन व्यक्ती म्हणून वेल्हे तालुक्यातील प्रबोधिकांची निवड** सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमांना सातारा जिल्ह्यातील गावांमधून महिला बचतगटांच्या सदस्यांसाठी आयोजित कार्यक्रमांना ३ कार्यकर्त्यांना निमंत्रण देण्यात आले. सुलाताई धिंडले, विद्याताई शिंदे आणि रेणुका कानडे यांनी साताऱ्यात तर सुवर्णाताई गोखले यांनी वेल्ह्यात दिवसभराची कार्यशाळा घेतली.



साधन व्यक्ती सत्कार

**३)वटपौर्णिमाः** वटपौर्णिमेच्या सणाला वडाच्या पूजेचे आजच्या काळाच्या दृष्टीने काय महत्त्व आहे. त्यातील शास्त्रीय गोष्टी कोणत्या आणि त्याचा अर्थ काय हे समजून घेऊन वडाची पूजा करणे ही कल्पना ग्रामीण भागात गेली ३ वर्षे रुजवायचा आपण प्रयत्न करीत आहोत. या वर्षी ४ गावांमधील १७५ महिला आणि युवती या अशा प्रकारच्या सार्थ पूजेला उपस्थित होत्या. ही पूजासुद्धा सांगितली स्त्री पुरोहितांनी. कोणतीही पूजा ही स्त्री पुरोहिता सांगू शकतात, त्याचा अर्थही त्या अधिकाराने विशद करू शकतात हे ग्रामीण भागात हळूहळू स्वीकारले जाईल.

तसे हे या पूजांचे तिसरे वर्ष. आता वेगवेगळ्या गावातील महिला पूजेची मागणी करीत आहेत. ज्ञान प्रबोधिनीतील संस्कृत संस्कृती संशोधिकेतील पुरोहिता दरवर्षी अशा पूजा सांगायला येत आहेत.

तसेच शिवरे, कासुर्डी आणि श्रीरामनगर येथे मार्गशीर्षातील लक्ष्मीपूजन झाले.



वटपौर्णिमा

**४) शिवरे संक्रांत मेळावा**

शिवरे गावातील बचतगटाच्या सदस्यांनी गावात मेळावा आयोजित केला. यात शिवगंगा गुंजवणी खोऱ्यातील २३ गावांमधून प्रबोधिनीच्या कार्यकर्त्या आल्या होत्या. एकूण ४५० महिला उपस्थित होत्या. संक्रांतीनिमित्त योजिलेल्या या मेळाव्याला इनरव्हील क्लबच्या सभासदांनी विविध स्पर्धा घेतल्या आणि बक्षिसे दिली. ज्ञान प्रबोधिनीच्या विविध उपक्रमांची माहिती ग्रामस्थांना सांगितली गेली. भोर तालुक्याच्या विस्तार अधिकाऱ्यांनी शासकीय योजनांची माहिती सविस्तरपणे गावाला दिली. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शाखाधिकारी किल्लेदारताईंनी बचतगटातील महिलांना मार्गदर्शन केले. किशोरी विकास उपक्रमातील कल्याणच्या विद्यार्थिनींनी व्यसनमुक्तीवरील प्रसंगनाट्य सादर केले. मा. कार्यवाह सुभाषराव देशपांडे तसेच मा. माधवराव देशपांडे हे कार्यक्रमाला उपस्थित होते.

खोरेपातळीवरील कार्यक्रम महिला करू शकतात आणि यात स्थानिक राजकारणाला महत्त्व न देता समाजकारण करणाऱ्यांनी व्यासपीठावर बसावे ह्याचे उदाहरण महिलांनी गावासमोर ठेवले. या कार्यक्रमाच्यावेळी संपूर्ण गावाला भोजन देण्याची व्यवस्था गावातील पुरूषवर्गाने पेलली. महिला पुढे जात असतील तर त्यांना पाठिंबा द्यायला गावातील



शिवरे संक्रांत मेळावा

पुरूषांनी एकत्र व्हायला हवे, हे कामाच्या परिणामामुळे घडू शकते, हे गावाला समजले.

या मेळाव्यातून प्रेरणा घेऊन कल्याण गावातील महिलांनी वार्षिक हिशोबाच्या वेळेस गावापातळीवर मेळावा घेतला व सर्व गावांस जेवण दिले.



कार्यकर्त्यांची नियमित बैठक

.**✽ कामशेत व मावळ या भागातील ग्रामपंचायत सदस्यांचे पंचायतराज प्रशिक्षणः–** सुवर्णाताई गोखले यांनी दोनही तालुक्यांमध्ये अनुक्रमे १०० आणि ३० सदस्यांचे प्रशिक्षण घेतले.

**✽ स्थानिक नेतृत्वाच्या बैठकी :–** गेल्या १५ वर्षांपासून शिवापूर येथे दर महिन्याच्या २२ तारखेला शिवगंगा खोऱ्यातील गावप्रतिनिधींची बैठक होत आहे. ही निर्णय करणाऱ्यांची निर्णय करण्यासाठी घेतलेली बैठक आहे. त्याचप्रमाणे वेल्हे येथे १० वर्षांपासून अशी बैठक होत आहे. या बैठकीसोबत या वर्षी आंबवणे येथे वाजेघर पट्ट्यातील गावांच्या प्रतिनिधींची बैठक तसेच आंबवण्याच्या जवळील गावांच्या प्रतिनिधींची बैठक सुरू झाली. या तीनही बैठकींमधून ४० गावांच्या प्रतिनिधी दरमहा हजर असतात.



पंचायतराज प्रशिक्षण

**✽ प्रज्ञा मानस विभागाच्या परिषदेत निबंध वाचन**

**' कुशाग्र बुद्धिमत्ता : आगामी आव्हाने '** या राष्ट्रीय पातळीवरील तीन दिवसांच्या परिषदेत ग्राम विकसन विभागातील कामाविषयीचे ३ निबंध वाचण्यात आले. किशोरी विकास उपक्रम, आरोग्य प्रबोधिकांसोबतचे काम व विविध संधींमुळे तयार झालेल्या प्रबोधिकांसोबतच्या कामावरील निबंध अनुक्रमे वीणाताई तिखे, सुवर्णाताई गोखले आणि अनघाताई लवळेकर यांनी वाचले.

**✽ संचालकासह बैठक :–** ग्रामीण भागातील स्त्रीशक्तीसाठी काम करणाऱ्या १७ कार्यकर्त्यांची नियमित मासिक बैठक यावर्षीपासून मा. संचालक व मा. कार्यवाहांच्या उपस्थितीत होण्यास सुरवात झाली. या बैठकीमधून कामाचे निवेदन होते तसेच एकत्रित विचार होतो. अशा ९ बैठका या वर्षात झाल्या.


**✽ ऋणनिर्देश ✽**

**आर्थिक योगदानः–** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. शांताराम दत्तात्रेय पटवर्धन यांनी मोलाच्या अर्थसाहाय्याबरोबरच विविध कामांच्या कल्पना सुचविल्या. ग्रामीण भागातील जीवन कमी कष्टाचे व्हावे व तिचे अर्थोत्पादन व त्याचबरोबर तिचा आत्मसन्मान वाढावा यासाठी वेगवेगळ्या कल्पनांचे योगदान त्यांनी केले. शेतकरी सन्मानाने जगावा आणि त्यांचे जीवन अधिक सुखकर व्हावे यासाठी ते सातत्याने प्रबोधिनीसोबत काम करीत असतात.

पुण्यातील विविध व्यक्ती व संस्थांकडून मुलींच्या शिक्षणासाठी मोलाचे असे अर्थसाहाय्य शिष्यवृत्त्यांच्या माध्यमातून प्रबोधिनीच्या कार्यकर्त्या विजयाताई रसाळ यांनी संपूर्ण वर्षभर प्रयत्न करून उभे केले. साहाय्यक परिचारिका वर्गातील विद्यार्थिनींसाठी पुण्यातील अनेक डॉक्टरांनी, उद्योजकांनी, व्यावसायिकांनी व दात्यांनी विजयाताईंकडे आपले अर्थसाहाय्य सुपुर्द केले.

सिकोया कंपनीने वेल्ह्यातील किशोरींच्या हिमोग्लोबीन तपासणीसाठी पैसे उभे केले.

पुण्यातील वेगवेगळ्या इनरव्हील क्लब व रोटरी क्लब या संस्थांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे आर्थिक योगदान दिले. काही व्यक्तींनी स्वतःचा वेळ, तज्ज्ञता कामासाठी उपलब्ध करून दिले. या व ज्यांचा नामोल्लेख नाही अशा सर्वांच्या सहकार्यामुळे हे काम शक्य झाले. या सर्वांप्रती आंम्ही ऋणी आहोत.


**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**


**प्रेषक :**

**ज्ञान प्रबोधिनी**

**स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)**

५१०, सदाशिव पेठ

पुणे ४११ ०३०

दूरभाष क्र. २४२०७१६२, २४२०७०००